बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष -०२ | अंक -०६ | सोमवार दि.२३ सप्टेंबर २०२४ | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रू | । पाने ४
Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-02 | Issue -06 | MONDAY DT.23SEPTEMBER 2024 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4

MO.9860898564
अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
# आरंभ
संपादक - दिपक थोरात



- भाऊंच्या नेतृत्वावर शिक्कामोर्तब
- हजारो गाड्यांचा ताफा घेवून मुंबईत दाखल
- राजधानीत मुस्लिम एकतेचे भव्य दर्शन




# राजधानीत मुस्लिमांचा एल्गार

बीड (प्रतिनिधी)

तेरा मेरा रिश्ता क्या... नहीं करेंगे, नही करेंगे, नबी के शान में गुस्ताखी बर्दाश्त नही करेंगे, अशा गगनभेदी घोषणा देत लाखोंच्या संख्येने रस्त्यावर उतरलेल्या मुस्लिम समाजाने आज खऱ्या अर्थाने एकजुटीची ताकद दाखवली. राजकीय जोडे बाजूला ठेवून आणि गट-तट, मतभेद विसरून सकल मुस्लिम समाज लाखोंच्या संख्येने मुंबईकडे कुच करू लागला आहे.

औरंगाबाद येथून निघालेल्या हजारो गाड्यांच्या ताफ्यामुळे समृध्दी महामार्ग ठप्प झाला होता. तब्बल ३० किलोमीटरपर्यंत गाड्यांच्या रांगा लागल्या होत्या. प्रत्येक गाडीला तिरंगा झेंडा आणि वाचाळविराविरुध्द गगनभेदी घोषणा देत सहभागी झालेला मुस्लिम आज राज्य सरकारकडून न्यायाची अपेक्षा करणार आहे. तिरंगा रॅली आज सायंकाळी मुंबईत दाखल झाल्यानंतर मुख्यमंत्र्यांना संविधानाची प्रत भेट देण्यात येणार आहे. 'देश दादागिरी और बकवास से नही, तो संविधानसेही चलेंगा' याची जाणीव यामाध्यमातून राज्य सरकारला करून देण्यात येणार आहे. त्यानंतर या विशाल रॅलीला राज्यभरातून आलेले धर्मगुरु (उलेमा इकराम) यांच्यासह मान्यवर संबोधित करणार आहेत. एवढेच नव्हे तर या ऐतिहासिक रॅलीतून हजरत मोहम्मद पैगंबर (स.अ.) यांच्याविषयी अपशब्द वापरणाऱ्या रामगिरी महाराजासह मुस्लिम समाजाबद्दल द्वेषभावनेतून बोलणाऱ्या नितेश राणेलाही अटक करा अशी मागणी लाखोंच्या जनसमुदायाकडून करण्यात येणार आहे. दरम्यान इतिहासात पहिल्यांदाच सकल मुस्लिम समाज कोणत्याही झेंड्याखाली, संघटनेसोबत न येता समाजासाठी एकत्र आल्याचे चित्र राज्यभरात पहायला मिळत आहे. लाखोंच्या संख्येने निघालेल्या या तिरंगा रॅलीला अख्खा महाराष्ट्र उघड्या डोळ्याने पाहतोय, मुस्लिम समाजातही एकजुटीची क्रांती या तिरंगा रॅलीच्या माध्यमातून पहायला मिळत असून मुस्लिम एकता झिंदाबाद असा नारा राज्यभर घुमू लागला आहे.


## वाचाळविरांना धडा शिकवा-ॲड.शेख शफिक

# राष्ट्रीय महामार्गाच्या पथदिव्यांचं उद्घाटन झाले शाही मात्र श्रीफळ फोडण्याची सत्ताधाऱ्यांनी एकच केली घाई !

केज । प्रतिनिधी

लॉक डाऊनचा २०१९ चा काळ तसा प्रत्येकाच्या आठवणीत राहण्यासारखाच आहे. कोविड १९ व्हायरसने संपूर्ण जगभरात थैमान घातले होते. त्यातच २०१९ म्हणजे लॉक डाऊन पडण्याच्या अगोदर मांजरसुंबा ते धायगुडा पिंपळा या राष्ट्रीय महामार्गाचे काम सुरू झाले. रस्ता खोदकामाने याची सुरुवात झाली. भले मोठ मोठे टिप्पर, जेसीबी राष्ट्रीय महामार्गावर ठांड मांडून काम करत होती. तर रस्त्यावर जागोजागी खड्डे आणि धुळ दृष्टीस पडत होती. सदरील राष्ट्रीय माहामार्गाचे काम एच.पी.एम. कंपनीला मिळाले खरे परंतु हि कंपनी एका मालकाची नव्हती म्हणजे तीनं तीघाड आणि काम बिघाडं असेच म्हणावे लागेल कारण एच चा मालक एक पी चा मालक दुसरा तर एम चा मालक तीसरा असे तीघे एकत्र येऊन एचपीएम हि कंपनी तयार झाली होती. हितच खरी या राष्ट्रीय माहामार्गाची वाट लागली कारण या कंपनीने तुकडया-तुकड्यामध्ये कामे करायला सुरुवात केली. प्रत्येक तुकड्याचे कामे करण्यासाठी वेगळा गुत्तेदार. असे करत करत या रस्त्यावर जेवढी गावे ,शहरे येत होती तेथे असंख्य गुत्तेदार तयार झाले. त्याच रस्त्यावर येणारे केज शहर याला कसे सुटेल .सन २०२२ मध्ये केज नगरपंचायतीच्या निवडणुका होऊन जनविकास परिवर्तन आघाडीने कॉंग्रेसला सोबत घेत केज नगरपंचायतीवर सत्ता स्थापन केली आणि राष्ट्रीय महामार्गाच्या विकासात जास्तीची भर पडली जैसे वो वैसे आप म्हणणाची वेळ केजच्या जनतेवर आली. सन २०२३ मध्ये एच.पी.एम कंपनीने केज शहरामध्ये राष्ट्रीय महामार्गाच्या मधोमध पथदिवे बसवायास सुरुवात केली त्यावेळेस केज नगरपंचायतच्या सत्ताधार्यांनी याकडे दुर्लक्ष केले. पथदिवे बसविणे झाल्यावर हस्तांतरणाची प्रक्रिया पार पडली मात्र दिवे चमकलेच नाही ना कधी त्यांचा प्रकाश केजकरांनी पाहिला. त्यातच केज विकास संघर्ष समितीचे हनुमंत भोसले सर यांच्या अंदोलनाकडे शहरातील जनतेने लक्ष वेधुन घेतले. अंदोलनामुळे केज न.प. च्या सत्ताधाऱ्यांनी घाई-गडबड करत मोठ-मोठया रस्त्यालगत डि.पी .बसविल्या उद्घाटनाची वेळ ठरली दिवस ठरला १७ संष्टेबर २०२३, नेतेगन एकत्र बोलविले , श्रीफळ आणले,पत्रकारांना आमंत्रित केले,जोरजोरात श्रीफळ फोडून उद्घाटन संपन्न झाले . भाषणे झाली , थोर विचार केजकरांनी ऐकले. त्यातच अंधार पडायला सुरुवात झाली सुर्य अदृश्य झाला पोर्णीमेच्या चंद्राच्या प्रकाशात जनता गणपती बप्पाचे विसर्जनासाठी रस्त्यावर उभी होती. पथदिव्याकडे पाहत होती. आता सुरू होतील मंग सुरू होतील मात्र ४ वर्षानंतर देखील पथदिवे सुरू झालीच नाहित.

कधी होणार केजचा विकास ? होणार कि नाही ? पथदिवे सुरु होणार का ? का



भयान काळोखात अपघाताने गमवावा लागणार कुणाला आणखी आपला जीव ? आदि प्रश्न केज शहरातील जनतेला पडली आहेत. मात्र सत्ताधारी याला उत्तर प्रकाशाने देतात कि अंधाराने हे पाहणे गरजेचे.



# डोंगरावर वृक्ष लागवड करून जवानांना मानवंदना

अंबाजोगाई ।प्रतिनिधी

हैदराबाद मुक्त करण्यासाठी भारतीय सेनेने ऑपरेशन पोलो अभियान अवघ्या पाच दिवसात निजाम सेना शरण आली भारतीय सेनेने अतुलनीय सर्व गाजवली हे ऑपरेशन पोलोमध्ये भारतीय सेनेचे जवान शहीदही झाली त्या जवानांना वृक्षारोपणाने मानवंदना देण्यात आली जवानांचे कार्य हे डोंगराएवढे होते

म्हणून त्यांना डोंगरावर वृक्ष लागवड करून त्यांना मानवंदना देण्यात या वेळी योगेश्वरी शिक्षण संस्थेचे संचालक एम एस लोमटे,प्रा.एन. के.गोळेगावकर शिवाजी यादव रमाकांत यादव आदी उपस्थित होते.



बीड: आदर्श शिक्षण संस्था कर्मचारी सहकारी पतपेढी म. बीडच्या ४१ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेप्रसंगी माजी मंत्री जयदत्त अण्णा क्षीरसागर यांचा सत्कार करताना पतपेढीचे अध्यक्ष थिटे ए.एस व उपाध्यक्ष बेग रियाज.

# शिरसाळा येथे धनगर आरक्षणासाठी रास्ता रोको आंदोलन

सिरसाळा ।प्रतिनिधी

परळी तालुक्यातील मौजे शिरसाळा येथे धनगर आरक्षणाचा रस्ता रोग करण्यात आला आहे सर्व सकल धनगर बांधव उपस्थित होता या मोर्चाचे नेतृत्व तालुकाध्यक्ष चंदू भैया कराड व पंढरीदादा काळे वेंकटेश काळे सतीश जी काळे व परिसरातील सर्व धनगर समाजाचे कार्यकर्ते उपस्थित होते धनगर समाजाचा अनुसूचित जातीमध्ये आदिवासी समावेश करण्याच्या पुन्हा एकदा विषय अहिराणी वर आला आहे सन १९८० मध्ये पासून धनगर



समाजाच्या मागणी सतत त्यांना मांडून धरलेली होती परंतु या लढाईमध्ये आजपर्यंत त्यांना अपयश पदरात पडले आहे त्यासाठी शिरसाळा येथे सकल धनगर समाजाच्या वतीने रस्ता रोको करण्यात आला आहे या धनगर समाजाच चे परिसरातील सकल धनगर समाज उपस्थित होता यावेळी निवेदन देताना सिरसाळा पोलीस स्टेशनचे एपीआय दहिफळे साहेब पोलीस कॉन्स्टेबल मुंडे साहेब पोलीस क शिंगोळे साहेब व जेठेवाड साहेब यांना निवेदन देण्यात आले व रस्ता रोको एकदम शांतपणे संपला असे जाहीर करण्यात आले आहे

# धनगर आरक्षणासाठी परळीतील ईटके कॉर्नर येथे तासभर रास्ता रोको आंदोलन

## वाहनांच्या लागल्या रांगा; सरकारने तत्परता न दाखवल्यास उग्र आंदोलनाचा दिला इशारा

परळी (प्रतिनिधी) :- पंढरपूर , लातूर , नेवासा या ठिकाणी उपोषणाला बसलेल्या धनगर जमातीच्या उपोषणकर्त्यांना पाठिंबा म्हणून धनगर आरक्षण अंमलबजावणी एसटी प्रमाणपत्र मिळण्यासाठी आरक्षणाच्या हक्कासाठी धनगर जमातीच्या वतीने परळी-वैद्यनाथ येथील ईटके कॉर्नर येथे तासभर रास्ता रोको आंदोलन केले. सरकारचा जाहीर निषेध नोंदवत घोषणा दिल्या. परळी-वैद्यनाथ येथील ईटके कॉर्नर आंदोलकांनी बीड -परभणी-नांदेड महामार्ग रोखून धरला. या रास्ता रोकोमुळे मोठी वाहतूक कोंडी होऊन वाहनांच्या रांगा लागल्या. यामुळे काही काळ वाहतुक खोळंबली होती. धनगर आरक्षण प्रश्नी सरकारने तत्परता न दाखवल्यास उग्र आंदोलन करण्याचा इशारा धनगर समाजचे युवा नेते शिवदास बिडगर व आदोलकांनी दिला आहे.

आदिवासी समाजाच्या आरक्षणाला धक्का न लावता धनगर जमातीला एसटी या प्रवर्गातून आरक्षण द्यावे. या प्रमुख मागणीसह पंढरपूर, लातूर व नेवासा येथे सुरू असलेल्या उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी संपूर्ण राज्यभर धनगर समाजाचे नेते आ. गोपीचंद पडळकर यांच्या आव्हानाला पाठिबा देत रस्ता रोको आंदोलन करण्यात आले. तसेच



या सरकारने तात्काळ मागणीचे परिपत्रक काढावे या मागणीसाठी अंदोलकांनी जोर धरला. समाजाचा अनुसूचित जमाती (एसटी) प्रवर्गाची अंमलबजावणी करून त्यांना आरक्षण देण्याची मागणी करत रस्त्यावर बसून आंदोलन केले . आम्ही राज्य सरकारकडे नवीन काहीही मागत नाही. आम्हाला फक्त आमचा हक्क हवा आहे जो भारतीय संविधानाने दिलेला आहे आणि तो म्हणजे एसटी प्रवर्गातून आरक्षण,आम्ही सरकारला विनंती करतो की आमच्या संयमाची परीक्षा घेऊ नका. उशीर झाल्यास आम्हाला आंदोलन अधिक तीव्र करावे लागेल आणि परिणामास सरकार जबाबदार असेल. वर्दळीच्या रस्त्यावर सुमारे एक तास हे आंदोलन चालल्याने परळी-वैद्यनाथ येथील ईटके कॉर्नर येथे दोन्ही बाजूंची वाहतूक कोंडी झाली होती. तहसीलदार यांना समाज बांधवांनी आपल्या मागण्यांचे निवेदन दिले. यावेळी धनगर समाजाचे युवा नेते शिवदास बिडगर, विकास बिडगर, दिलीप बिडगर, माऊली गडदे, भिवा बिडगर, विश्वनाथ देवकते, चंद्रकांत देवकते, भिमराव सातपुते, कमलाकर बिडगर, माऊली धायगुडे, मुंजा फुके, प्रविण बिडगर, लक्ष्मण कावळे, कपिल गाडेकर, नवनाथ दाणे, दादाराव गडदे, महादेव हाके, शाम सरवदे, गणेश देवकते, गोविंद यमगर, अंगद देवकते, रामभाऊ कोपणर, महादेव गडदे, चंद्रकत बिडगर, गोपाळ बिडगर, शिवाजी कुकर, सुग्रीव बिडगर, शाम सरवदे, परमेश्वर वैद्य, श्रीहरी कामाळे, हनुमंत कामाळे, व्यंकटेश हरणावळ व सकल धनगर समाज परळी-वैद्यनाथ जिल्हा बीड यांनी केले आहे.

# देवळा बु परिसरात वीज पडून सात शेळ्या दगावल्या

ढेकणमोहा प्रतिनिधी

वडवणी तालुक्यातील देवळा बुद्रुक ग्रामपंचायत अंतर्गत येणाऱ्या कानोबाची वाडी या शिवारात दिनांक २२ रोजी दुपारी दोनच्या सुमारास नानासाहेब कल्याण पेज गुडे वय ३० वर्ष राहणार कानोबाची वाडी हे आपल्या शेळ्या घेऊन कानिफनाथ मंदिर परिसरात आपल्या शेळ्या शेतात चारत होते अचानक झालेल्या पावसामुळे वीज कोसळून नानासाहेब पेजगुडे यांच्या सात शेळ्या जागीच दगावल्या या प्रकरणाची महसूल विभाग प्रशासनाने तात्काळ पंचनामा करून सदरील शेतकऱ्याला आर्थिक मदत उपलब्ध करून द्यावी अशी मागणी पीडित शेतकरी व गावकऱ्यांच्या वतीने करण्यात येत आहे



# सरकारच्या शेतकरी विरोधी धोरणांच्या निषेधार्थ पितुर घालून जिल्हाधिकारी कार्यालयासमो लक्ष्यवेधी आंदोलन:- डॉ.गणेश ढवळे

## बीड –महाराष्ट्र सरकारचे शेतकरी विरोधी धोरण हेच शेतकऱ्यांचे मरण असुन

कृषी विषयक जाचक ई पीक पाहणी अट रद्द करून अतिवृष्टीमुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना सरसकट नुकसान भरपाई द्यावी, बीड जिल्ह्यातील केवळ २ महसूल मंडळात ३३ टक्के पेक्षा जास्त नुकसान नाही हा कृषी विभागाचा वादग्रस्त अहवाल रद्द करावा, ओला दुष्काळ जाहीर करावा, सन २०२३ चार खरीप पिकविमा तातडीने द्यावा, शासनाने पिक कर्ज थकीत शेतकऱ्यांची खाती होल्ड न करण्याचे आदेश बँकाना द्यावेत आदि कृषी विषयक विविध मागण्यांसाठी आणि संवेदनाहिन सरकारच्या निषेधार्थ सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली दि.२३. वार सोमवार रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सरकारचे विधिवत पितुर घालुन लक्ष्यवेधी आंदोलन करण्यात आले यावेळी आंदोलनात शेख युनुस, रामनाथ खोड, सुदाम तांदळे,शिवशर्मा शेलार, मुस्ताक शेख, बाळासाहेब मुळे आदी आंदोलनात सहभागी होते.जिल्हाधिकारी बीड यांच्या मार्फत मुख्यमंत्री, प्रधान सचिव कृषीमंत्री, कृषी सचिव यांना निवेदन देण्यात आले.अ )मागणी क्रमांक १

ई– पिक पाहणीची जाचक अट रद्द करावी ; निम्म्याहून अधिक शेतकरी पीक विमा आणि अनुदानापासून वंचित

परळी येथील राज्यस्तरीय कृषी महोत्सव उद्घाटन प्रसंगी मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांनी ई पिक पाहणी अट रद्द करण्याची घोषणा केली होती.मात्र शासन आदेश निघालेच नाहीत घोषणा हवेतच विरली. बीड जिल्ह्यातील १० लाख ८४ हजार शेतकरी खातेदारांपैकी केवळ ३ लाख ४३ हजार शेतकऱ्यांनी ई पिक पाहणी केली आहे.त्यामुळे अर्ध्यापेक्षा जास्त शेतकऱ्यांना पिक विमा व ईतर शासकीय योजनांचा लाभ मिळणार नाही. राज्य शासनाने सन २०२३ मधील कापूस आणि सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना प्रति हेक्टर ५००० रूपये प्रमाणे २ हेक्टर पर्यंत अर्थसहाय्य देण्याचा निर्णय शासन स्तरावर घेण्यात आलेला आहे.मात्र ज्यांनी मागील वर्षी खरीप हंगामात ई पीक पाहणी केली आहे केवळ त्यांनाच ५००० रूपये अर्थसहाय्य मिळणार असुन बीड जिल्ह्यातील १० लाख ६९ हजार शेतकरी खातेदारांपैकी केवळ ४ लाख ९३ हजार शेतकऱ्यांनी ई पिक पाहणी केली आहे त्यामुळे ५ लाख ७५ हजार शेतकरी खातेदार या अनुदानापासून वंचित राहणार आहेत. त्यामुळे



मुख्यमंत्री महोदयांनी आपला शब्द पाळुन जाचक ई पीक पाहणी अट रद्द करावी.

आ ) मागणी क्रमांक २

पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी मराठवाडा मुक्ती संग्राम दिनी २५ टक्के पीक विमा अग्रीम रक्कम तातडीने देण्याची घोषणा अजुनही हवेतच

सप्टेंबर २०२४ मध्ये बीड जिल्ह्यातील ६१ महसूल मंडळात अतिवृष्टीमुळे खरीप हंगामातील पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. शेतकऱ्यांच्या नुकसानीची भरपाई विमा योजनेतुन व्हावी यासाठी प्रधानमंत्री पीक विमा अंतर्गत जिल्ह्यात ४२० कोटीहुन आधिक रक्कम देण्यात आली आहे.यंदाच्या खरीप हंगामात

नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना पीक विमा कंपनीकडून २५ टक्के अग्रीम रक्कम तातडीने दिली जाईल असे आश्वासन कृषीमंत्री महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री बीड यांनी १७ सप्टेंबर मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या मुख्य ध्वजारोहण सोहळ्याप्रसंगी दिले होते दिले. यासंदर्भात त्यांनी पीक विमा कंपनीच्या अधिकाऱ्यां सोबत बैठकही घेतली.मात्र २५ टक्के अग्रीम देण्याबाबत अजुनही संथगतीने काम सुरू असल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजी आहे.त्यामुळे युद्ध पातळीवर काम करून तातडीने २५ टक्के पीक विमा अग्रीम देण्यात यावा.

इ) मागणी क्रमांक ३महसूल व कृषीचे पंचनामे ३ आठवड्यानंतरही अद्याप अपुर्ण; सरसकट नुकसान भरपाई द्यावी बीड जिल्ह्यात ३१ ऑगस्ट व एक सप्टेंबर रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे ६१ महसूल मंडळे प्रभावी झाले होती.अतिमुसळधार पावसानंतर आठवडा लोटल्यानंतरही शेतात साचलेले पाणी जमिनीत न मुरल्याने पिके पिवळी पडुन वाया गेली आहेत. दरम्यान ३ आठवडे उलटल्यानंतर जिल्ह्यातील ६५ टक्के पंचनामे पुर्ण झाले असुन अतिवृष्टीमुळे तब्बल १०२५ गावातील ३ ८१ हजार २२७ शेतकऱ्यांच्या शेतातील ३ लाख ३५ हजार ६६१ हेक्टर क्षेत्रावरील पिकांना फटका बसला आहे.मात्र ३ आठवडे उलटुनही अद्याप महसूल व कृषी विभागाचे पंचनामे अद्याप अपुर्ण असुन तातडीने पूर्ण करण्यात येऊन सरसकट आर्थिक मदत करावी.फटका बसला असुन ७ लाख ५० हजार हेक्टर कृषी विभागाच्या अहवालातुन स्पष्ट झाले आहे.ई) मागणी क्रमांक ४बीड जिल्ह्यातील केवळ २ तालुक्यात ३३ टक्के पेक्षा जास्त नुकसान हा कृषी विभागाचा वादग्रस्त अहवाल रद्दबातल करावा.

बीड जिल्ह्यातील केवळ २ तालुक्यात ३३ टक्के पेक्षा जास्त नुकसान कृषी विभागाचा अहवाल बीड जिल्ह्यात दि.१ आणि २ सप्टेंबर २०२४ रोजी तब्बल ६१ महसुली मंडळात अतिवृष्टी झाली होती.यामुळे शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेल्या पिकांचे मोठे नुकसान झाले होते.कृषीमंत्री तथा पालकमंत्री बीड धनंजय मुंडे यांनी पंचनाम्याचे आदेश देताना सरसकट आर्थिक मदतीचे आश्वासन दिले होते.मात्र दुसरीकडे कृषी विभागाने नुकसानीचा प्राथमिक अहवाल जाहीर केला असुन यामध्ये परळी व माजलगाव या दोनच तालुक्यात ३३ टक्केहुन आधिक नुकसान झाल्याचे म्हटले आहे.३५ महसूल मंडळात १०० मिमि पेक्षा जास्त पाऊस झाला होता.जिल्ह्यातील ६६८ गावांतील २ लाख हेक्टरहुन आधिक क्षेत्र बाधित झाले होते. एनडीआरएफ निकषाप्रमाणे ३३ टक्याहुन आधिक नुकसान असेल तरच शेतकरी शासनाच्या मदतीसाठी पात्र ठरतो त्यामुळे कृषी विभागाच्या या अहवालामुळे शेतकऱ्यांना आर्थिक मदत मिळण्यास अडचणी निर्माण होणार आहेत त्यामुळे त्याची दुरुस्ती करण्यात यावी.

# भेंडटाकळी येथील स्वस्त धान्य दुकानदाराचा मनमानी कारभार

## कुटुंबातील लहान लेकरांचे अंगठे घेऊन धान्य लंपास करण्याचा ग्रामस्थांचा आरोप



### भेंडटाकळी येथील ग्रामस्थांनी दिले पुरवठा अधिकाऱ्यांना निवेदन

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई : तालुक्यातील भेंडटाकळी येथील स्वस्त धान्य दुकानदाराचा मनमानी कारभारामुळे लाभार्थी वैतागले आहेत. आम्ही भेंड टाकळी तांडा येथील गावकरी असून सर्व लाभार्थी शासनाच्या स्वस्त धान्याच्या लाभापासून वंचित आहोत. गेली कित्येक वर्षे आम्हाला स्वस्त धान्याचा लाभ मिळालेला नाही. गेली कित्येक वर्षे आमच्या गावामध्ये धान्याचा काळा बाजार चालू आहे. जर आम्ही राशन दुकानदार यांना काही जाब विचारला तर ते उडवा-उडवीची भाषा करतात. आणि संक्रांती सणाच्या दिवशी महिलांसाठी आलेल्या कीट आल्या होत्या तर त्या सर्वाचे वाटप सुद्धा अद्याप झालेले नाही.

शासनाकडुन आलेले स्वस्त धान्यांचा माल बाहेर कुकुटपालनासाठी काळ्या बाजारात विकले जात आहे, आणि आमचे उसतोड कामगार या हक्कांचे धान्यापासून वंचित राहतात तरी त्यांचे मुले घरी असतात तर राशन दुकानदार यांत्रिक मशीन द्वारे घरो घरी जाऊन आश्वासन देत अंगठे लावून घेतात आणि स्वस्त धन्य स्वताच्या नावावर करून घेतात गोरगरिबांच्या तोंडातला खास हिरावुन घेत असल्याचा आरोप लाभार्थ्यांनी केला आहे.या प्रकरणाची गांभीर्याने दाखल घ्यावी हि सर्व भेंड टाकळी येथील गावकर्याकडून तहसील कार्यालय गेवराई पुरवठा अधिकारी कडे राशन दुकानदारांच्या विरोधात गावकऱ्यांचे वतीने निवेदन देऊन चोकशी करण्यात यावी अशी मागणी अर्जदार काशिनाथ किसन राठोड, विश्वनाथ सिताराम चव्हाण, जनार्दन लिंबा चव्हाण, पिंटू रतन राठोड, सचिन सोपान जाधव, राहुल परमेश्वर राठोड, पापा अंबादास चव्हाण, कैलास जगन्नाथ जाधव, सोपान बंकट चव्हाण, बाळू छगन राठोड, गणपत अंबादास पवार ,प्रदीप संपत पवार ,संदीप बळीराम राठोड, बाळू रतन राठोड ,एकनाथ राठोड ,पवन जगन्नाथ जाधव, यांनी निवेदन देऊन चोकशी करण्यात यावी अशी मागणी केली आहे.

# तुळजाभवानी संस्थेला तब्बल १८ कोटी ५२ लाख रुपयांचा नफा; चेअरमन चंद्रकांत शेजुळ यांनी दिली माहिती

माजलगाव : सहकार क्षेत्रात मानबिंदू ठरलेल्या तुळजाभवानी अर्बन मल्टीस्टेट को-ऑप क्रेडिट सोसायटी लि.माजलगाव संस्थेने यंदाही आपली गरूड झेप कायम ठेवली असून संस्थेला तब्बल १८ कोटी ५२ लाख रुपयांचा नफा झाला आहे, अशी माहिती संस्थेचे चेअरमन चंद्रकांत शेजुळ यांनी रविवारी दिली. संस्थेच्या १३ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या अध्यक्षस्थानावरून बोलत होते. दरम्यान, संस्थेच्या सभासदांना १० टक्के डिव्हीडंड अर्थात लाभांश देण्यात येणार असल्याची घोषणा चंद्रकांत शेजुळ यांनी केली.

माजलगाव येथील व्यंकटेश मंगल कार्यालयात रविवार, दि.२२ सप्टेंबर रोजी संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा घेण्यात आली. अध्यक्षस्थानी चेअरमन चंद्रकांत शेजुळ होते. सभेच्या प्रारंभी महाराष्ट्राची कुलस्वामिनी आई तुळजाभवानी माता व कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. तर दीपप्रज्वलन बँकिंग तज्ज्ञ नितीन वाणी यांच्या हस्ते आणि सर्व सन्माननीय संचालकांच्या उपस्थितीत करण्यात आले. या मंगल प्रसंगाची सुरूवात महाराष्ट्रगीत आणि मराठवाडा गीताने करण्यात आली. याप्रसंगी सर्व सभासदांचा यथोचित सन्मान करण्यात आला. सभेचे प्रास्ताविक उपाध्यक्ष ज्ञानेश्वर देशमुख यांनी केले तर तुळजाभवानी अर्बनचे मुख्य कार्यकारी अधिकारी शहाजी शेजुळ यांनी सभेसमोरील



महत्त्वपूर्ण विषयांचे बाचन करून उपस्थित मान्यवरांचे लक्ष वेधले.

या सभेला संचालक भारत रामराव होके, अभय रामराव पवार, सुशिल रामराव डक, नितीन मदनराव काळे, राजेश्वर राधाकिसन कुलथे, दिनेश पंडितराव बिराजदार, तुकाराम महादेव जगधने, वैशाली विजयसिंह सोळंके, शोभा मदनराव आंबोरे, भास्कर गवळी आदींची उपस्थिती होती. सभेचे सूत्रसंचालन पुरुषोत्तम जाधव, नारायण झोडगे यांनी तर आभार संस्थेचे विभागीय अधिकारी नवनाथ शिंगणे यांनी मानले. वार्षिक सर्वसाधारण सभा यशस्वी करण्यासाठी तुळजाभवानी अर्बनचे सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. शेवटी पसायदानाने सभेची सांगता झाली.

## वार्षिक ताळेबंदाचा आढावा; संस्थेला 'अ' वर्ग दर्जा कायम

संस्थेचे चेअरमन चंद्रकांत शेजुळ यांनी वार्षिक ताळेबंदाचा आढावा घेतला. पुढे बोलताना चंद्रकांत शेजुळ म्हणाले, २०१२ साली संस्थेची स्थापना करण्यात आली. आजमितीला संस्थेकडे सभासद आणि ग्राहकांची १,४४,०३० एवढी संख्या आहे. संस्थेचे भागभांडवल ९ कोटी ९६ लाख एवढे आहे. संस्थेकडे ५९१ कोटी ६९ लाख रूपये ठेवी आहेत. संस्थेने तब्बल ३८३ कोटी रूपयांचे कर्ज ग्राहकांना दिले आहे. संस्थेचा निव्वळ नफा १८ कोटी ५२ लाख एवढा झाला आहे. संस्थेला 'अ' ऑडिट वर्ग मिळाला असल्याची माहिती शेजुळ यांनी दिली.

# साहीत्यरत्न आण्णाभाऊ साठे यांना भारतरत्न द्या मागणी साठी मुंबईत एल्गार सभा तालुक्यातुन कार्यकर्ते जाणार : चंद्रसेन पाटुळे

किल्लेधारूर ।प्रतिनिधी

डेमोक्रेटिक पार्टी आफ इंडीयाचे वतीने साहीत्यरत्न आण्णाभाऊ साठे यांना भारतरत्न हा सन्मान देऊन भारत सरकारने गौरव करावा या साठी सतत पाठपुरावा केला जात आहे या मागणी साठी भायखळा मुंबई येथे एल्गार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे राज्यभरातून कार्यकर्ते येणार आहेत धारूर तालुक्यात गाव निहाय संपर्क दौरा करून तालुकाध्यक्ष चंद्रसेन पाटुळे यानी तालुक्यातील कार्यकर्त्यानी मोठ्यासंख्येने उपस्थीत राहण्याचे अवाहण केले आहे.



केंद्रशासनाने साहीत्यरत्न आणाभाऊ साठे यांना भारताचा सर्वोच्य भारतरत्न हा सन्मान देऊन सन्मानीत करावे या मागणी साठी डेमोक्रटिक पार्टी ऑफ इंडीया चे वतीने भायखळा मुंबई येथे एल्गार सभेचे आयोजन २७सप्टेंबर रोजी करण्यात आले आहे या सभेला साहीत्यरत्न साठे प्रेमी राज्यभरातुन उपस्थीत राहणार आहेत. या कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थानीसंघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रा. सु.कुमार कांबळे तर उदघाटक म्हणुण राष्ट्रवादी काग्रैस चे संस्थापक अध्यक्ष शरदचंद्र पवार हे तर प्रमुख पाहुणे म्हणुण आ. सतेज पाटील हे उपस्थीत राहणार आहेत हा एल्गार मेळावा प्रभावीपणे यशस्वी होण्या साठी प्रदेशाध्यक्ष अजिंक्य भैय्या चांदने हे कार्यकर्त्यासह परीश्रम घेत आहेत या मेळाव्यास धारूर तालूक्यातून शेकडो कार्यकर्ते या एल्गार सभेला जाणार असून तालूक्यात गावागावात जाऊन बैठका घेऊन या एल्गार सभेला उपस्थीत राहण्याचे अवाहण साहीत्यरत्न आण्णाभाऊ साठे प्रेमीना करण्यात आले असून मोठ्या सख्येने कार्यकर्त्यांनी उपस्थीत राहण्याचे अवाहण तालूकाध्यक्ष चंद्रसेन पाटुळे यांनी केली आहे.

# सावित्री-फातिमा सद्भावना मंच बीड तर्फे फिरत्या ग्रंथालयाचे स्वागत

बीड ।प्रतिनिधी

इस्लामिक मराठी पब्लिकेशन ट्रस्ट मुंबई द्वारे संचालित इस्लामिक मराठी फिरते ग्रंथालय दरवर्षी महाराष्ट्रात जात असते. काल हे ग्रंथालय बीड मध्ये आले असता सावित्री-फातिमा सद्भावना मंच बीड तर्फे या ग्रंथालयाचे स्वागत करण्यात आले. याप्रसंगी मंच चे अध्यक्ष लोकपत्रकार भागवत तावरे, उपाध्यक्ष सूफियान मणियार, मुक्त पत्रकार कोषाध्यक्ष एस.एम.युसूफ़ तसेच ज्येष्ठ मार्गदर्शक व उर्दू दैनिक तामिर से संपादक काझी मखदुम, जमात ए इस्लामी हिंद बीड चे सचिव शेख मोईज़ोद्दीन, उर्दू दैनिक अल्हिलाल टाइम्स, दैनिक बीड संघर्ष चे संपादक ख़मरूल इमान खान यांनी पुष्पगुच्छ



देऊन ग्रंथालयाचे संचालक शेख मुसा यांचे स्वागत केले. या ग्रंथालयात इस्लाम धर्मावर आधारित अनेक पुस्तकांचे प्रदर्शन करण्यात आले होते. दिव्य कुराण मराठी भाषांतर, पैगंबर चरित्र, स्त्री व बालकांविषयी विविध विषय या ग्रंथालयाद्वारे सादर करण्यात आले होते. शहरातील रसिक वाचकांनी या ग्रंथालयाला भेट देऊन पुस्तकांचा लाभ घेतला. बशीरगंज परिसरात हनुमान मंदिर समोर ग्रंथालयाच्या आयोजनात मंदिराचे विश्वस्त मदन महाराज शिवणीकर यांचे मोलाचे सहकार्य लाभले.



# माजलगाव मतदारसंघात मातंग समाजाचे संवाद दौरे करणार

माजलगाव /प्रतिनिधी

माजलगाव विधानसभा मतदारसंघातील माजलगाव, धारूर, वडवणी या तीनही तालुक्यांमध्ये असलेल्या मातंग समाज बांधवांच्या संवाद दौरे करणार असल्याचे ब्रह्मगावचे उपसरपंच अनिल राधे कांबळे यांनी सांगितले.

शहरातील शासकीय विश्रामगृह येथे दि. २२ सप्टेंबर रविवार रोजी आयोजित संवाद बैठकीत ते बोलत होते. कार्यक्रमास युवा नेते बाबा कांबळे यांची उपस्थिती होती. बोलताना अनिल राधे कांबळे म्हणाले की, मतदार संघातील मातंग समाज बांधवांचा फक्त मतदानापुरता वापर राजकीय मंडळी करत आहे समाजाचे विविध प्रश्न समस्या असून या सोडवण्यासाठी आपण पुढाकार घेणार असल्याचे त्यांनी सांगितले. बोलताना युवा नेते बाबा कांबळे म्हणाले की, मतदार संघातील तीनही तालुक्यांमध्ये समाजातील जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य अथवा नगरसेवक अशा कुठल्याही पदावर समाज बांधव नसल्याची खंत व्यक्त करत आमच्या समाजाची दखल घ्यावी यासाठी दि. २३ सप्टेंबर पासून मतदारसंघातील वडवणी तालुका दौरा त्यानंतर माजलगाव व धारूर तालुका मातंग समाज युवा संपर्क संवाद दौऱ्याने पिंजून काढणार असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी या कार्यक्रमास आसाराम खंडागळे , लहू अवघडे, आविष्कार भिसे, विजय सुतार, सुनिल अलझेंडे, विलास लोंढे, राहुल आरे, विकास पटेकर,विकास कांबळे, बालू आडगळे , ताक सिंग, आकाश कारके, मधुकर ताटे, सुहास श्रीरसागर, गणेश घडसिंगे, प्रताप तूपसमुंदर, गणेश साबळे,मयूर कांबळे, प्रवीण कांबळे, विक्रांत कांबळे, संकेत कांबळे, दत्ता कांबळे, अवी कांबळे, युवराज कांबळे, अभि कांबळे, आदित्य कांबळे, अभिषेक वाघमारे, रोहित खंडागळे, भारत कांबळे, आदित्य वाघमारे, प्रदीप कांबळे, शरद कांबळे, विकास घडसींगे, सौरभ कांबळे, सचिन कांबळे, बाळु कांबळे, अनिकेत कांबळे, प्रशांत कांबळे, किरण कांबळे, सुमित कांबळे यांचेसह मतदार संघातील तीनही तालुक्यातील कार्यकर्ते व समाजबांधव उपस्थित होते.

# मातंग समाजातील कार्यकर्त्याला आंबेडकरी मार्गावर आणून लहान मोठ्या सभागृहात पोहचवण्यासाठी काम करणार - अमोल शेरकर

धारूर ।प्रतिनिधी

दि. २२ सप्टेंबर रोजी धारूर शासकीय विश्राम ग्रह येथे अमोल शेरकर यांच्या नेतृत्वाखाली धारूर तालुक्यातील मातंग समाजाच्या शहरी व ग्रामीण भागातील कार्यकर्त्यांची बैठक पार पडली यावेळी बोलताना अमोल शेरकर म्हणाले की मातंग समाज हा आंबेडकरी विचाराच्या प्रवाहात आला पाहिजे त्या शिवाय समाजाचे हक्क आणि आधिकार विषयी जागृती होणार नाही आज माजलगाव मतदारसंघात मातंग समाजासाठी लाजिरवाणी गोष्ट आहे की समाजाचा एकसुद्धा प्रतिनिधी कुठल्याच




सभागृहामध्ये नाही जिल्हा परिषद सदस्य पंचायत समिती सदस्य किवा नगरसेवक नाही माजलगाव मतदारसंघात २५-३० हजार मातंग समाजाचे मतदान आहे

पण त्याची दखल कोणताच पक्ष किंवा नेता घेत नाही ऑन येणाऱ्या काळात आपण समाजाच्या न्याय हक्कासाठी रस्त्यावर उतरू आणि ह्या प्रस्थापित लोकांना ह्यांची जागा दाखवल्या शिवाय आपल्या मताची किंमत कळणार नाही म्हणून आपले लोक सभागृहात पाठवा तेच आपल्या न्याय हक्कासाठी लढत आहेत व त्यासाठी आम्ही कायम लढा लढत राहू असे मत अमोल शेरकर यांनी व्यक्त केले यावेळी या बैठकीला सुरज लोखंडे , हनुमंत अडागळे, धनंजय साळवे , कैलास लोखंडे , किशोर अडागळे , अभी अडगळे, प्रसाद वाघमारे सुमित हातागळे व अनेक कार्यकर्ते उपस्थित होते

## २५.सप्टेंबर २०२४.बीड येथून हजारो संख्येने दिव्यांग मुंबईच्या मंत्रालयावर निघणाऱ्या

# दिव्यांच्या आक्रोश मोर्चास जाणार -शाहू डोळस

ढेकणमोहा ।प्रतिनिधी

प्रहार विव्यांग क्रांती आंदोलन महाराष्ट्र. संस्थापक, अध्यक्ष व दिव्यांग मंत्रालय अध्यक्ष (मंत्री दर्जा )मा. ओमप्रकाश बच्चू भाऊ यांचे आदेशाने दिव्यांग बांधवानाच्या गेल्या अनेक वर्षा पासून च्या मागण्या या झोपीस सोंग घेतलेल्या सरकारने याची दाखल घेतली नाही म्हणून मा. ओमप्रकाश उर्फ बच्चू भाऊ कडू यांनी छ. संभाजी नगर नंतर आता मुंबई येथे मंत्रालयावर भव्य असा आक्रोश मोर्चा काढत आहेत तेव्हा अशा महत्वाच्या मागणी घेऊन मा बच्चू भाऊ मुंबईच्या मंत्रालय येथील महात्मा गांधी पुतळा येथुन धडकणार आहे या मध्ये दिव्यांगना प्रति महिना ६००० मानधन मिळाले पाहिजे. दिव्यांगना विना अट घरकुल मंजूर करावे. शासकीय हद्दीत दिव्यांगा साठी २००चौरस फूट जागा व्यवसायासाठी देव्यात यावी. दिव्यांगची नोकर भरती तात्काळ राबावण्यात यावी. बोगस दिव्यांग यांचा शासनाने शोध घेऊन त्याच्यावर कडक कार्यवाही करण्यात यावी. स्थानिक स्वराज्य संस्थे मधील दिव्यांगचा ५%निधी प्रति वर्षी दिव्यांगचे खातेवर वर्ग करण्यात यावा. स्थानिक स्वराज्य सांस्थेत दिव्यांगना राजकीय आरक्षण देण्यात यावे.



या व इत्तर अनेक मागण्यासाठी मा. बच्चू भाऊ कडू यांचे नेत्रवाखा ली भव्य आक्रोश मोर्चा निघणार आहे या मोर्चा साठी हजारोच्या संख्येने मुंबई येथे वेळेला मिळेल त्या वाहनाने यावे असे आवाहन प्रहार दिव्यांग क्रांती आंदोलन चे बीड जिल्हा उपाध्यक्ष शाहू डोळस, महिला आघाडी जिल्हा अध्यक्ष शिलाताई उजगरे, विषणु सावसे, दत्ता कदम, ओमप्रकाश चाटे, नागनाथ सावजी, पद्मिन तार्डे, इंगळे, नानासाहेब दीड्युल, राजकुमार थेटे, संदीपान बारगजे, प्रा. राजेंद्र अडागळे, राम धुतादमल, गव्हाणे दादा, लक्षमन काळे, मुळे,बाबासाहेब झिंजूरडे,दराडे, प्रभू माने, राम कोकणे,बाळासाहेब बहिर,शेक रहीम,अशा बर्गजे,धनंजय गिरी, सोमा जाधव,, साबळे, शिंदे,इ. यांनी केले आहे.

## परळीत धनगर जमातीच्या आरक्षणासाठी आक्रमक :२३ सप्टेंबर रोजी होणाऱ्या रस्ता रोको

# आंदोलनात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे- शिवदास बिडगर, विश्वनाथ देवकते,चंद्रकांत देवकते

### धनगर आरक्षण चलो परळी-वैद्यनाथ चलो परळी-वैद्यनाथ



परळी ।प्रतिनिधी

पंढरपूर , लातूर , नेवासा या ठिकाणी उपोषणाला बसलेल्या धनगर जमातीच्या उपोषणकर्त्यांना पाठिंबा म्हणून धनगर आरक्षण अंमलबजावणी एसटी प्रमाणपत्र मिळण्यासाठी सोमवार दिनांक २३/९/२४ रोजी सकाळी १० वाजता परळी-वैद्यनाथ येथील ईटके कॉर्नर येथे रस्ता रोको चे आयोजन करण्यात आले आहे. तरी सर्व परळी-वैद्यनाथ विधानसभा मतदारसंघातील सकल धनगर समाजच्या रास्ता रोको मध्ये सहभागी होऊन आपल्या हक्काच एस टी आरक्षण मिळवण्यासाठी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आव्हान धनगर समाजाचे युवा नेते शिवदास बिडगर, विश्वनाथ देवकते, चंद्रकांत देवकते व सकल धनगर समाज परळी-वैद्यनाथ जिल्हा बीड यांनी केले आहे.

आदिवासी समाजाच्या आरक्षणाला धक्का न लावता धनगर समाजाला एसटी या प्रवर्गातून आरक्षण द्यावे. या प्रमुख मागणीसह पंढरपूर, लातूर व नेवासा येथे सुरू असलेल्या उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी तसेच या सरकारने तात्काळ मागणीचे परिपत्रक काढावे या मागणीसाठी रस्ता रोको आंदोलन करण्यात येणार आहे.गेल्या अनेक वर्षांपासून धनगर जमातीचा अनुसूचित जमाती प्रवर्गामध्ये समावेश करावा अशी मागणी आहे. २०१४ साली महायुतीचे सरकार असताना पहिल्या कॅबिनेट मध्ये धनगर जमातीच्या आरक्षणाचा प्रश्न निकाली काढू असे आश्वासन तत्कालीन मुख्यमंत्री यांनी शब्द दिला होता. आताही सरकार त्यांचेच आहे. विधानसभा निवडणुकीपूर्वी समाजाच्या आरक्षणाचा प्रश्न निकाली काढावा अन्यथा या सरकारला पाडल्याशिवाय धनगर समाज स्वस्त बसणार नाही असा इशारा दिला.

आदिवासी समाजाच्या आरक्षणाला धक्का न लावता धनगर समाजाला एसटी या प्रवर्गातून आरक्षण द्यावे. या प्रमुख मागणीसाठी सोमवार दि. २३/९/२४ रोजी सकाळी १० वाजता परळी-वैद्यनाथ येथील ईटके कॉर्नर येथे रस्ता रोको चे आयोजन करण्यात आले आहे. तरी समाज बांधवांनी या आंदोलनाला मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन धनगर समाजाचे युवा नेते शिवदास बिडगर, विश्वनाथ देवकते, चंद्रकांत देवकते व सकल धनगर समाज परळी-वैद्यनाथ जिल्हा बीड यांनी केले आहे.

# जयदीप कवाडे यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाधिकारी कार्यालयावर आक्रोश मोर्चा - अनिल तुरुकमारे

बीड ।प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील विविध मागणी संदर्भात ३० सप्टेंबर २०२४ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयावर लोकशाही मार्गाने आक्रोश मोर्चा काढला जाणार आहे यामध्ये हजारोच्या संख्येने सहभागी व्हावे, राष्ट्रीय कार्याध्यक्ष पी.आर.पी चे जयदीप भाई कवाडे यांच्या नेतृत्वाखाली मोर्चा निघणार आहे.अशी माहिती पीपल्स रिपब्लिकन पार्टी बीड जिल्हाध्यक्ष समाजभूषण अनिल तुरुकमारे यांनी निवेदाद्वारे माहिती दिली आहे. मोर्चातील प्रमुख मागण्या बीड जिल्ह्यातील कसत असणाऱ्या शेतकऱ्यांना सातबारा तात्काळ देण्यात यावा. गायरान धारक शेतकऱ्यांच्या सातबारा वरील पोट खराब शब्द काढुन त्यांना खरीप, रब्बी, पिक विमा भरण्याचा व राष्ट्रीयकृत बँकेकडुन पिककर्ज मिळण्याचा मार्ग मोकळा करुन पंतप्रधान कृषी सन्मान निधीचा व इतर शासनाच्या सर्वयोजनेचा लाभ देण्यात यावा.महात्मा फुले महामंडळ, अण्णाभाऊ साठे महामंडळ संत रोहिदास चर्मकार महामंडळ, वसंतराव नाईक महामंडळ, अपंग महामंडळाला तात्काळ निधी देऊन प्रस्ताव दाखल केलेल्या लाभार्थीचे प्रस्ताव तात्काळ मंजुर करण्यात यावेत.

शासकीय जागेवर घरे बांधुन राहणाऱ्या शहरातील, ग्रामीण भागातील नागरीकांना पी.टी.आर.देऊन शासनाच्या इतर योजनेचा लाभ देण्यात यावा.भटके विमुक्त आदिवासी समाजातील नागरीकांच्य विकासासाठी स्वतंत्र आराखडा करावा. पारधी, भिल्ल समाजातील बांधवाना शासनाने जात प्रमाणपत्रासाठी अडवणुक करण्यात येऊ नये व तात्काळ जात प्रमाणपत्र देण्यात यावे. लोकनेते गोपीनाथराव मुंडे मागासवर्गीय सुतगिरणी बोगस बनावट असुन विद्यार्थी, विद्यार्थीनी, नौकरीदार यांचे परस्पर जात वैधता प्रमाणपत्र घेऊन वस्त्रउद्योगाचे २७ कोटी, समाजकल्याणचे १४ कोटी ऊचलुन शासनास फसवले याची उच्च पातळीवर चौकशी करण्यात येऊन मुख्यप्रवर्तक संगिता ठोंबरे व चेअरमन विजय प्रकाश ठोंबरे विरुध्द ४२० चा गुन्हा दाखल करुन त्यांची सर्व मालमत्ता जप्त करण्यात यावी. केज पोलीस स्टेशनचे वरिष्ठ अधिकारी लोकनेते गोपीनाथराव मुंडे मागासवर्गीय सुतगिरणी

चौकशी प्रकरणी वरिष्ठांचे आदेश पायदळी तुडवत आहेत. त्यांच्यावर कार्यवाही करण्यात यावी. बीड नगर परिषदने स्वच्छता टेंडर बंद करुन शहरात सफाई काम करणाऱ्या शेकडो महिलांना कामावरुन कमी केल्यामुळे शहरात घाणीचे साम्राज्य वाढले आहे. तरी त्यांना तात्काळ कामावर घेण्यात यावे.संत भगवान बाबा समाज कल्याण अंतर्गत ऊसतोड मजुरांच्या मुलांचे,



मुलींचे वस्तीगृहात निकृष्ट जेवण दिले जात असुन सदरील प्रकरणाची तात्काळ चौकशी करावी व टेंडर रद्द करण्यात

यावे. बीड जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी पोस्टींग होऊनही अद्यापपर्यंत रुजु झाले नाहीत याची शासनाने तात्काळ दखल घ्यावी. या मागण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चात सहभागी व्हा असे आवाहन पीपल्स रिपब्लिकन पार्टीचे जिल्हाध्यक्ष समाजभूषण अनिल तुरूकमारे यांनी केले आहे.




नेकनूर पोलिस स्टेशन चे पि एस आय इसाक शेख यांनी सायं दैनिक महाराष्ट्र आरंभ या आमच्या कार्यालयात सदिच्छा भेट दिली असता त्यांच्या सत्कार करताना संपादक दिपक भाऊ थोरात, जावेद पठान रफिक पठान जमिर शेख फारूख पठान अंनिस शेख आदी

# माजलगावात धनगर समाजाचा एसटी आरक्षणासाठी दोन तास रस्ता रोको आंदोलन

## ट्राफिक सुरळीत करण्यासाठी पोलीस प्रशासनाला लागले दोन तास माजी आमदार होके आडसकर जगताप नाईकनवरे यादव यांनी दिला पाठिंबा

माजलगाव (प्रतिनिधी )गेल्या अनेक वर्षापासून धनगर समाजाची एसटी आरक्षणाची मागणी राज्यकर्त्यांच्या उदासीन धोरणामुळे प्रलंबित आहे या जिव्हाळ्याच्या मागणीसाठी माजलगाव तालुक्यातील सकल धनगर समाजाच्या वतीने परभणी फाटा येथे दिनांक २३ सप्टेंबर रोजी तब्बल दोन तास रस्ता रोको आंदोलन करण्यात आले या रोडवरील वाहतूक सुरळीत करण्यासाठी पोलीस प्रशासनाला तब्बल दोन लागले .

धनगर जमातीस एसटी आरक्षणाची अंमलबजावणी करावी या जिव्हाळ्याच्या मागणीसाठी पंढरपुर ,लातुर,येथे दि.९ सप्टेंबर पासून राज्यव्यापी आमरण उपोषण सुरू आहेत या आंदोलनास पाठिंबा म्हणून दि. २३ सप्टेंबर रोजी सबंध महाराष्ट्रात रास्ता रोको आंदोलन करण्याचे हाक




समाजाच्या वतीने देण्यात आली होती म्हणून त्या हाकेला ओ म्हणून माजलगाव तालुक्यातील सकल धनगर समाजाच्या वतीने परभणी फाटा चौकत दि. २३ सप्टेंबर रोजी सकाळी ११ ते दुपारी १वाजेपर्यंत तब्बल दोन तास रस्ता रोको आंदोलन करण्यात आले या आंदोलनात सहभागी होऊन माजीआ. राधाकृष्ण होके पाटील, रमेशराव आडसकर, नितीनराव नाईकनवरे, राहुल जगताप, शरद यादव, यांनी मनोगत व्यक्त करून जाहीर पाठिंबा दिला आहे.

तर समाजाच्या वतीने डॉ. भगवानराव सरवदे, तुकाराम येवले, विजय धायगुडे , प्रा. प्रकाश गवते, ज्ञानेश्वर सरवदे, अँड संतोष बाबरे,मुक्तीराम आबूज, राम अबुज ,राजा अर्जुन, यांनी मनोगत व्यक्त केली तर सूत्रसंचालन विशाल देवकते यांनी केले या रस्ता रोकोला बबनराव सरवदे अण्णासाहेब वगरे विलास नेमाने,अविनाशराव कांडुरे,सुभाषराव गडदे किसनराव हराळ कल्याणराव गवते प्रभाकर धरपडे ,नारायण सातपुते, डॉ अशोक तिडके, लक्ष्मणराव गायकवाड,कल्याण कसपटे, यांच्यासह हजारो तरुण वृद्ध याआंदोलनात सहभागी झाले होते

यावेळी महसूल च्या वतीने महामुनी आणि रूपचंद आभारे यांनी आंदोलनकर्त्यांचे निवेदन स्वीकारले यावेळी पोलीस निरीक्षक बालक कोळी यांनी चोक बंदोबस्त दिला होता

# कर्मचारी पतसंस्था कर्मचाऱ्यांसाठी मोठा आधार : डॉ.योगेश क्षीरसागर

## बीडमध्ये नवगण, विनायक कर्मचारी सहकारी पतसंस्थेची सर्वसाधारण सभा उत्साहात

बीड (प्रतिनिधी)

बीड येथील नवगण, विनायक कर्मचारी सहकारी पतसंस्थेतचे कार्य उत्कृष्ट असून यामुळे कर्मचाऱ्यांना हक्काचा आधार ठरलेली आहे. यात वाढ करत संस्थेने कर्मचाऱ्यांसाठी विविध उपक्रम राबविण्यास सुरुवात करावी, असे मत संस्थेचे सहसचिव तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी व्यक्त केले.बीड शहरातील नवगण, विनायक शिक्षण संस्थेची नवगण, विनायक कर्मचारी सहकारी पतसंस्थेची २७ वी सर्वसाधारण सभा रविवारी (दि.२२) सकाळी ११:३० वाजता शहरातील के.एस.के येथील स्पोर्ट्स सभागृहात पार पडली. यावेळी डॉ.योगेश क्षीरसागर हे प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते.सभेच्या अध्यक्षस्थानी माजी नगराध्यक्षा तथा शिक्षण संस्थेच्या उपाध्यक्षा प्रा.दीपा क्षीरसागर या




होत्या. यावेळी डॉ.सारिकाताई क्षीरसागर, नवगण शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रा.किशोर काळे, संचालक आमेर सिद्दीकी, प्रशासक प्रा.सुधाकर गुट्टे, कार्यालयीन अधीक्षक व्ही.टी.देशमाने, पतसंस्थेचे अध्यक्ष बालासाहेब चवार, सचिव राजेंद्र कुऱ्हे, विना भोज, लिंबाजी उजगरे, सुनिल सपाटे, रमेश चौरे, सचिन पवार, श्रीहरी लहाने, रिझवान काझी, रमेश जाडकर यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी डॉ.योगेश क्षीरसागर यांनी अध्यक्ष बालासाहेब चवार आणि संचालक मंडळाचे कौतुक केले. या कर्मचारी संस्थेमुळे कर्मचाऱ्यांना हक्काचा आधार मिळत असल्याचे म्हटले. कार्याचा आणखी विस्तार वाढवून बदलत्या काळानुसार विविध उपक्रम राबविण्यात यावेत, असे मत व्यक्त करत पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या. तसेच, डॉ.दीपा क्षीरसागर यांनी अध्यक्षीय भाषणात मार्गदर्शन करत संस्थेच्या पदाधिकाऱ्यांचे कौतुक केले. या सर्वसाधारण सभेचे बालासाहेब चवार यांनी प्रास्ताविक करताना कामकाजावर प्रकाश टाकून वार्षिक अहवाल सादर केला. यावेळी सर्व मान्यवरांचे कर्मचारी संस्थेच्यावतीने सत्कार करण्यात आला. सुत्रसंचलन शेख ताजुद्दीन यांनी केले. ही सर्वसाधारण सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. यावेळी सभासद, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# सावित्री-फातिमा सद्भावना मंच बीड तर्फे फिरत्या ग्रंथालयाचे स्वागत

बीड ।प्रतिनिधी

इस्लामिक मराठी पब्लिकेशन ट्रस्ट मुंबई द्वारे संचालित इस्लामिक मराठी फिरते ग्रंथालय दरवर्षी महाराष्ट्रात जात असते. काल हे ग्रंथालय बीड मध्ये आले असता सावित्री-फातिमा सद्भावना मंच बीड तर्फे या ग्रंथालयाचे स्वागत करण्यात आले. याप्रसंगी मंच चे अध्यक्ष लोकपत्रकार भागवत तावरे, उपाध्यक्ष सूफियान मणियार, मुक्त पत्रकार कोषाध्यक्ष एस.एम.युसूफ़ तसेच ज्येष्ठ मार्गदर्शक व उर्दू दैनिक तामिर से संपादक काझी मखदुम, जमात ए इस्लामी हिंद बीड चे सचिव शेख मोईज़ोद्दीन, उर्दू दैनिक अल्हिलाल टाइम्स, दैनिक बीड संघर्ष चे संपादक ख़मरूल इमान खान यांनी पुष्पगुच्छ देऊन ग्रंथालयाचे संचालक शेख मुसा यांचे स्वागत केले. या ग्रंथालयात इस्लाम धर्मावर आधारित अनेक पुस्तकांचे प्रदर्शन करण्यात आले होते. दिव्य कुराण मराठी भाषांतर, पैगंबर चरित्र, स्त्री व बालकांविषयी विविध विषय या ग्रंथालयाद्वारे सादर करण्यात आले होते. शहरातील रसिक वाचकांनी या ग्रंथालयाला भेट देऊन पुस्तकांचा लाभ घेतला. बशीरगंज परिसरात हनुमान मंदिर समोर ग्रंथालयाच्या आयोजनात मंदिराचे विश्वस्त मदन महाराज शिवणीकर यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# सकारात्मक विचार शिक्षण क्षेत्र प्रवाही ठेवतात-डॉ. वासुदेव मुळाटे

## रोटरी क्लब ऑफ माजलगाव सिटीच्या वतीने रोटरी राष्ट्र शिल्पकार पुरस्कार सोहळा संपन्न

माजलगाव प्रतिनिधी

सकारात्मक विचार हेच शिक्षणाचे प्रवाही रूप टिकविणार , शिक्षकाची जागा कुणीच घेवु शकत नाही , अलिकडे सामाजिक चळवळी तुन सत्य बाजुला गेले आहे अशी खंत ही प्रसिद्ध साहित्यिक डॉ. वासुदेव मुळाटे यांनी व्यक्त केले. दिनांक २२ सप्टेंबर २०२४ रोजी सर्वपल्ली राधाकृणांनं यांच्या जयंती निमित्त रोटरी क्लब ऑफ माजलगाव सिटी च्या वतीने रोटरी राष्ट्र शिल्पकार पुरस्कार सोहळा २०२४ वैष्णवी मंगल कार्यालय येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाला कार्यक्रमाचे अध्यक्ष रोटरी क्लब चे विद्यमान अध्यक्ष तथा श्री मंगलनाथ मल्टीस्टेट चे व्यवस्थापकीय संचालक ड.रवींद्र कानडे व कार्यक्रमाच्या प्रमुख उपस्थिती मध्ये रोटरी क्लब डिस्ट्रिक्ट सहा.प्रांतपाल श्री विवेक गंगणे हे होते... लता जोशी , स्मिता कानडे , सुरेखा गवळी , प्रभाकर साळेगावकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

अध्यक्षीय मनोगतात रविंद् कानडे म्हणाले शिक्षक वर्ग हा राष्ट्राचा कना असतो व समाजाला योग्य दिशा देण्याचे कार्य करतो व तो समाजातील महत्वपूर्ण घटक आहे त्यामुळे आदर्श शिक्षक यांचा यथोचित सन्मान होणे आवश्यक असून रोटरी क्लब माजलगावच्या वतीने दरवर्षी नियमित सदरील पुरस्कार




सोहळ्याचे आयोजन केले जाते.

या शिक्षकांचा झाला सन्मान.

पुरस्कृत शिक्षकांमध्ये श्री भारत राऊत (हरकी निमगाव ),श्री बालाप्रसाद चव्हाण (सुलतानपूर) श्री सोमेश्वर मोरे (रेणापूरी)श्री नंदकुमार शिंदे (माजलगाव )श्री नागनाथ पडलवार (माजलगाव)श्री राधाकिसन चव्हाण (मनुरवाडी)श्री गणेश राठोड (माजलगाव) श्री चंद्रमणी डोंगरे (माजलगाव)श्रीमती जयश्री देशमुख (माजलगाव) श्रीमती पंचशीला फुलोरे ( की. आडगाव ) श्रीमती भाग्यश्री पत्की (माजलगाव )

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रभाकर साळेगावकर यांनी काम पाहिले तर सूत्र संचालन ड.दीपक देशमुख व डॉ.सुशीलभय्या लोढा यांनी केले तर कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन रोटरी क्लब च्या विद्यमान सचिव सौ. लता जोशी यांनी केले. तर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी रोटरी क्लब च्या सर्व सदस्यांनी आपले महत्त्वपूर्ण योगदान दिले.सदरील कार्यक्रमाकरिता माजलगाव परिसरातील , सामाजिक,राजकीय,शिक्षक वर्ग,व्यापारी वर्ग, पत्रकार बांधव व परिसरातील शेकडोच्या संख्येने नागरिक उपस्थित होते.



# सर्व धर्म समभाव ठेवूनच आपण राजकीय वाटचाल करतो माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर

बीड ।प्रतिनिधी

आपआपल्या कर्मानुसार, धर्मानुसार प्रत्येकजण आचरण करत असतो. देशात तिसरा धर्म म्हणून ख्रिश्चन धर्म आहे. सर्व धर्म समभाव ठेवूनच आपण राजकीय वाटचाल करतो असे प्रतिपादन माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी केले. रविवार दि.२२ रोजी बीड शहरातील असेंबलीज ऑफ गॉड चर्च या ठिकाणी ख्रिश्चन समाजाच्या वतीने प्रार्थनेचे आयोजन करण्यात आले. यावेळी माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी उपस्थित राहुन सहभाग घेतला. यावेळी बोलतांना माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर म्हणाले की, आज प्रार्थनेच्या दिवशी मुद्दामहून प्रभुंचरणी नतमस्तक होण्यासाठी आलो. प्रार्थनेत प्रचंड सामर्थ्य असते, आयुष्य जगत असतांना मानववादी विचार घेवून ख्रिश्चन समाज बांधव एकत्रित राहतात. गोर-गरीबांची सेवा करणे, मदत करणे आणि सेवाभाव ठेवून हा समाज पुढे जात आहे. त्याग हा मनातून असावा लागतो. तसा त्याग येंशुने केला आहे. चांगल्यांच्या पाठीशी राहणे या समाजाने ओळखले आहे. माझ्या राजकीय प्रवासात सर्व समाज पुर्ण ताकदीने उभा राहतो याची मला जाणिव आहे असे त्यांनी सांगितले. यावेळी कमिटीचे सर्व पदाधिकारी, समाज बांधव उपस्थित होते.

# महात्मा ज्योतिबा फुले शिक्षक पतसंस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न

परळी / प्रतिनिधी

येथील मान्यताप्राप्त, खासगी प्राथमिक, माध्यमिक विविध अनुदानीत शाळांतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचार्यांच्या महात्मा ज्योतिबा फुले शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी सहकारी पतसंस्थेच्या वतीने सभासदांना अकरा टक्के रोखीने लाभांश देण्यात येणार असल्याची माहिती संस्थेचे अध्यक्ष बंडू अघाव यांनी दिली.तर पतसंस्थेची योग्य दिशेने प्रगतीकडे वाटचाल सुरू आसून संस्थेने आपल्या कार्य क्षेत्रात वाढ करावी असे मत पी.एस.घाडगे यांनी व्यक्त केले.

या संस्थेची १० वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार (दि.२२) सप्टेंबर रोजी येथील रमाई प्रायमरी अँण्ड प्ले स्कूल मध्ये खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली. यावेळी सभेस संबोधीत करताना श्री अघाव बोलत होते. सभेला संस्थेचे मार्गदर्शक तथा लोकमान्य पतसंस्थेचे अध्यक्ष पी.एस.घाडगे, संस्थेचे सचिव आलिशान काजी, मुख्याध्यापक लिंबाजी दहिफळे, राजकुमार लाहोटी, वसंत राठोड, लोकमान्य नागरी सह.पतसंस्थेचे (मल्टीस्टेट) मुख्यकार्यकारी अधिकारी नितीन वायचळे आदि मान्यवर उपस्थित होते.




श्री अघाव म्हणाले, गेल्या १० वर्षापूर्वी शिक्षक नेते तथा लोकमान्य पतसंस्थेचे अध्यक्ष पी.एस.घाडगे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थापन झालेल्या या संस्थेचे सरत्या अर्थिक वर्षातील भागभांडवल ५४ लाख रूपये आहे तर तालुक्यातील एकूण पंधरा शाळेतील १३७ शिक्षक ,शिक्षकेत्तर कर्मचारी पतसंस्थेचे सभासद आहेत.संस्थेला सरलेल्या आर्थिक वर्षात १४ लाख ४५ हजार ८७० रूपये नफा झाला आसून संस्थेकडून सभासदांना पाच लाख रूपयापर्यंत साधे कर्ज दिले जाते तर एक लाखा पर्यंत तातडी कर्ज दिले जाते.संस्थेचा गेल्या पाच-सहा वर्षांपासून ऑडिट वर्ग *अ* आसल्याचे सांगून श्री अघाव यांनी सभासदांना अकरा टक्के रोखीने लाभांश देण्यात येणार असल्याची माहिती दिली. संस्थेचे मार्गदर्शक पी.एस.घाडगे तसेच सर्व संचालक, सभासदांचे सहकार्य या बळावर संस्थेची प्रगतीकडे वाटचाल चालू असल्याचे श्री अघाव यांनी सांगितले. यावेळी संस्थेचे मार्गदर्शक पी.एस. घाडगे यांनी सभेस संबोधित केले.सभेचे सुत्रसंचालन संचालक महादेव धायगुडे यांनी केले तर आभार संचालक उत्तम साखरे यांनी मानले.

# आम्ही छत्रपती शिवाजी महाराजांचे १८ पगड जातीचे मावळे आहोत ,मनुन जरांगे पाटलांना साथ आमची

## जिल्हा सचिव ऍड दत्ताजी जाधव

माजलगाव ।प्रतिनिधी

तालुक्यातील तसेच महाराष्ट्र राज्यातील कुणबी मराठा अरक्षणाचा लढा उभा करून मृत्यूलाही हरवत असलेले ,संघर्ष योध्दा सद्या उपोषणाला बसले आहेत.यात त्यांची आरोग्य परिस्थिती बिघडत आहे.त्यांनी प्रत्येक पीडित कुणबी मराठा माणसासाठी हा मोठा आरक्षण लढा उभा केला आहे. त्यामुळे त्यांच्या पाठीशी सर्व कुणबी मराठा व आम्ही१८ पगड जातीतील जाती येत्या विधानसभा निवडणुकित संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या पाठीशी खंभिर पणे उभे आहोत.असे



ठउच् चे बीड जिल्हा सचिव ऍड दत्ताजी जाधव यांनी आमच्या प्रतिनिधीशी संवादात मटले आहे.

मराठा आरक्षणाचा विचार घेतला आणि अजून सरकारास ताकत पहायची असेल तर मनोज जरांगे पाटील यांच्या आरक्षण लढ्यात आम्ही अठरा पगड जाती मनोज जरांगे यांच्या सोबत येत्या विधानसभा निवडणुकीत खंभिर पणे उभे राहणार आहोत.जेव्हा छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात आमच्यावर अन्याय अत्याचार होत होता तेंव्हा आमच्या समाजाचे रक्षणासाठी अहो रात्र लढणार समाज मणजे स्वराज्यातील कुणबी होता.याचे पार्ण ,ऋण फेडण्यासाठी आम्ही सकळ कुणबी मराठा समाजाचे संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या सोबत आहोत.

# दळभद्री राजकारणाने नेतेमंडळी अडचणीत

मुंबई (प्रतिनिधी)

जातीपाती व धर्माचे राजकारण करणाऱ्या महायुतीच्या नेत्यांना त्यांच्या या दळभद्री राजकारणाने आता चांगलेच अडचणीत आणले आहे. मराठा विरुद्ध ओबीसी व आदिवासी विरुद्ध धनगर,या समाजामध्ये भिंती उभारण्याचे काम,ज्या नेत्यांनी केले त्यांना लोकसभा निवडणुकीत विशिष्ट समाजाने चांगलाच हिसका दाखवला होता. त्या दणक्यानंतर तरी हे दळभद्री राजकारणी आपल्या वागण्यात सुधारणा करतील,अशी अपेक्षा होती. पण अंतरवाली सराटी व वडगोद्री या गावात तसेच मुंबईतील धारावी येथे जे काही चालले आहे,ते दंगलीना आमंत्रण देण्यासारखे आहे.

वास्तविक रस्ते बंद करणे,दगडफेक करणे,असे प्रकार करणाऱ्यांवर पोलिसांनी कठोर कारवाई करणे गरजेचे आहे. पण गृहखात्याने त्यांना तमाशाई बनवून ठेवले आहे. धनगर समाजाने देखील आंदोलन छेडल्यामुळे राज्यातील आदिवासी संघटना आता धनगर समाजाविरोधात एल्गार पुकारण्याच्या तयारीत आहेत. बोईसर पूर्व भागात चिल्हार फाटा येथे या संघटनांचा मेळावा आयोजित करण्यात आला होता. समाजात तेढ निर्माण करण्याचे जाणीवपूर्वक प्रयत्न करण्यात येत आहेत. त्याला सरकारने वेळीच आवर घातला नाहीतर परिस्थिती हाताबाहेर जाण्याची शक्यता आहे.

कोण गुलाबी जॅकेट्स घालून मतांचा जोगवा मागत फिरत आहेत. तर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे इव्हेंट्स करण्यात मश्गुल आहेत. तर दुसरीकडे राज्याचे गृहमंत्री हे केवळ बघ्याची भूमिका घेत फुकटचे सल्ले देत फिरत आहेत. राज्याची प्रशासकीय यंत्रणा पार कोलमडली असून कोणाचा पायपोसं कोणाच्या पायात नाही,अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. या राजकारण्यांनी मग ते सत्ताधारी असोत की विरोधक, त्यांनी कितीही पैशांची खिरापत वाटली तरी मतदार या निवडणुकीत या मतलबी नेत्यांना नक्कीच बाय बाय करणार आहेत.

# सिंचनासाठी हक्काच्या मुख्यमंत्री सौर कृषी पंप योजनेचा शेतकरी बांधवानी लाभ घ्यावा-ॲड. शंकर चव्हाण

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्रातील तमाम शेतकरी बांधवांनी शेतामध्ये सिंचनासाठी हक्काच्या महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या वतीने सुरु असलेली मागेल त्याला सौर कृषी पंप योजनेचा जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा असे आवाहन ड. शंकर चव्हाण यांनी केले आहे. तसेच सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी ऑनलाईन प्रणालीमार्फत अर्ज सादर करुन लाभा घ्यावा असेही ड. शंकर चव्हाण यांनी सर्व शेतकरी बांधवाना प्रसिध्दीपत्राकाच्या माध्यमातून आवाहन केले आहे. सदर योजनेसाठी लागणारे निकष हे महावितरण कंपनीने निश्चित केलेले असून, ५ एकरपर्यंत शेतजमीनधारक असणाऱ्या शेतकऱ्यांस ३ अश्वशक्ती क्षमतेपर्यंतचा सौर कृषी पंप, २.५१ ते ५ एकर पर्यंतच्या शेतकऱ्यांस ५ अश्वशक्ती क्षमतेचा आणि एकरवरील शेतजमीनधारक शेतकऱ्यांस



७.५ अश्वशक्तीची क्षमता असलेला सौर कृषी पंप दिला जाईल. अधिक माहितीसाठी शेतकरी बांधवानी तात्काळ सीएससी किंवा महाऑनलाईन केंद्राशी किंवा ऑनलाईन संकेतस्थळावर जाऊन संपर्क साधून त्याबाबत सखोल माहिती घेऊन कागदपत्रांची पूर्तता करावी व या योजनेचा लाभ घ्यावा. या योजनेची माहिती ही्ींिं://ािहरवळीले.ळप/ी-श्री या संकेतस्थळावरीही सविस्तर दिली गेली आहे. सदर योजना ही शेतकरी बांधवांसाठी वरदान आहे कारण यामध्ये लोडशेडींची कसल्याही प्रकारची कटकट नसणार आहे शिवाय नेहमी नेहमी होणाऱ्या विद्युत पुरवठा खंडीत होणाऱ्या लपंडावापासून आता सुटका मिळणार आहे.सदर सौरकृषीपंपाचे दिवसा शेतीपंपास वीजेची उपलब्धता, दिवसा विनाव्यतय अखंडित वीज पुरवठा, वीज बिलापासून मुक्तता, डिझेल पंपाच्या तुलनेत शून्य परिचलन खर्च, पर्यावरण पुरक परिचलन, शेती सिंचनाचा भाग वीज सबसिडीपासून पृथ्थकरण करणे तसेच औद्योगिक, वाणिज्यिक व घरगुती वीज ग्राहकांवरील क्रास सबसिडीचा बोजा कमीकरणे असे विविध फायदे आहेत. शिवाय योजनेची ठळक वैशिष्टे पारेषण विरहित १ लाख सौरकृषी पंप टप्प्या टप्प्यात उपलब्ध करुन देणे व सौर कृषीपंपासोबत दोन डि.सी. एल.ई.डी बल्ब, मोबाईल चार्जिंग व बॅटरी चार्जिंगची सुविधा (बॅटरी लाभार्थांनी घ्यावी) यांचा समावेश करण्यात आला आहे.राज्यात 'अटल' सौर कृषीपंप योजना राबविण्यासंदर्भात घेतलेल्या निर्णयासमवेत राज्य शासनाने १ लक्ष पारेषण विरहीत सौर कृषीपंप आस्थापित करण्यासाठी 'मुख्यमंत्री' सौर कृषीपंप योजना राबविण्यास शासन निर्णय क्र. सौरप-२०१८/प्र.क्र.४०१/उर्जा-७,दि.१५ नोव्हे.२०१८ अन्वये मंजूरी दिली आहे. या योजनेत सौर कृषीपंप ३ वर्षांच्या कालावधीत टप्पाटप्प्यात आस्थापित करण्यात येणार आहेत. प्रत्येक टप्पा प्रत्यक्ष सुरु झाल्यापासून पुढील १८ महिन्यात पूर्ण करावयाचा असून प्रथम टप्यात २५,००००० नग सौर कृषीपंप आस्थापनेचे उदिद्ष्ट देण्यात आले आहे.

# त्रिमूर्ती सरकारकडून शिक्षक भरती मध्ये आरक्षणाच्या जागा सर्वसाधारण प्रवर्गाला देऊन महा घोटाळा केला- वसंत मुंडे

परळी (प्रतिनिधी)

महाराष्ट्र मध्ये शिक्षण विभागात एससी एसटी ओबीसी प्रकल्पग्रस्त भूकंपग्रस्त माजी सैनिक आरक्षणामध्ये माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षकांच्या भरती पवित्र पोर्टलच्या माध्यमातून जिल्हा परिषद नगरपालिका महानगरपालिका भरतीमध्ये सर्वच आरक्षणाच्या जागा पात्र शिक्षक उपलब्ध असतानाही त्रिमूर्ती सरकारने आरक्षणाच्या जागा सर्वसाधारण वर्गाला वर्ग करून भरती केल्याचा पुराव्यासहित आरोप महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी ओबीसी विभागाचे प्रदेश उपाध्यक्ष वसंत मुंडे यांनी शासनाकडे चौकशीची मागणी केली असून संबंधित जबाबदार अधिकारी असेल त्यांच्यावर तात्काळ निलंबनाची कारवाई करण्यात यावी. मराठी शाळेत शिक्षण घेतलेल्या मराठी माध्यमातून पदवी तर शिक्षकावर अन्याय होत असून आरक्षणासंदर्भात सर्व स्तरावर उल्लंगन शिक्षक भरती पवित्र पोर्टलवर झालेले आहे. पवित्र प्रणाली अंतर्गत शिक्षक भरतीसाठी मुलाखतीशिवाय या प्रकारातील प्रकल्प समांतर आरक्षणातील रिक्त पदे त्या सामाजिक आरक्षणातील सर्वसाधारण गटासाठी रूपांतरित केलेले पदे प्रकल्पग्रस्त समांतर आरक्षणाचे उपलब्ध करून तात्काळ शासनाने कारवाई करावी. कारण शासनाने अनेक जीआर काढल्यामुळे शिक्षण खात्यामध्ये प्रचंड मराठी माध्यमातील शिक्षकावर अन्याय होतोय व इंग्रजी माध्यमांच्या शाळांना प्राधान्य दि.२५/२/२०२४ ला पवित्र पोर्टल वर दिसत आहे. शिक्षक भरती मध्ये आरक्षणाच्या सर्वच उमेदवारावर अन्याय तर केला असून ज्यांना सेवेत समाविष्ट करून घेतलेले आहे, अशा अनेक उमेदवारांना मुलाखतीला पुन्हा संधी



देण्यात आलेली आहे. ही गंभीर बाब आहे .तसे सर्व याद्यांमध्ये उमेदवाराचे माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रवर्गात यादीमध्ये समाविष्ट केलेले प्रसिद्ध नावे झालेली दिसतात ,अनेक पात्र उमेदवाराला संधी न दिल्यामुळे अन्याय झालेला आहे संपूर्ण भरती मध्ये महा घोटाळ्याची शासन स्तरावर तात्काळ चौकशी करून जे जबाबदार अधिकारी आहेत त्यांच्यावर कारवाई नियमानुसार करण्यात यावी. सर्वच एससी एसटी ओबीसी प्रकल्पग्रस्त भूकंपग्रस्त माजी सैनिक आरक्षणामध्ये उमेदवार उपलब्ध असतानाही भरती केली नाही तरी खुल्या प्रवर्गातील रूपांतरित केलेली पदे तात्काळ पूर्व प्राथमिक ,माध्यमिक व उच्च माध्यमिक यांची प्रवर्गनिहाय आरक्षण निहाय प्रत्यक्ष यादी लावून त्यांना सेवेत नियमानुसार घेण्याचे निर्देश व्हावेत तसेच पवित्र पोर्टलच्या पेज दोन मध्ये सर्वांचे आरक्षण, प्रकल्पग्रस्त भूकंपग्रस्त आणि माजी सैनिक यांच्या रूपांतरित केलेल्या जागा त्या प्रवर्गाला पुन्हा देऊन त्यांच्यावर झालेल्या भरती मधील अन्याय दूर करण्याची मागणी निवेदनाद्वारे करून शासन कडून तात्काळ अहवाल स्वयं स्पष्ट अभिप्रायसह सादर करावा असे आदेश देण्यात आल्याची माहिती माहिती काँग्रेस नेते वसंत मुंडे यांनी दिली

# विजय जाहेर यांची महाराष्ट्र महिला खो - खो संघाचे प्रशिक्षकपदी नियुक्ती

बीड (प्रतिनिधी) बीड जिल्ह्यातील गेवराई येथील मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित न्यू हायस्कूल शाळेतील क्रीडाशिक्षक तथा बीड जिल्हा खो -खो संघटनेचे सचिव, राष्ट्रीय खो -खो खेळाडू विजय जाहेर यांची खेलो इंडिया महिला खो-खो लीगसाठी महाराष्ट्र मुलींच्या संघाचे प्रशिक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. वडोदरा, गुजरात येथे २६ ते ३० सप्टेंबर दरम्यान होणाऱ्या पश्चिम विभागीय खेलो इंडिया महिला लिगसाठी मुलीचा संघ घोषित करण्यात आला आहे . या संघाच्या प्रशिक्षक पदी विजय भागवत जाहेर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या नियुक्तीमुळे त्यांचे अभिनंदन होत आहे . विजय जाहेर यांचे महाराष्ट्र खो- खो असोसिएशनचे आश्रयदाता तथा राज्याचे उपमुख्यमंत्री नामदार अजितदादा पवार, खो-खो संघटनेचे अध्यक्ष संजीव नाईक निंबाळकर, कार्याध्यक्ष सचिन गोडबोले, खजिनदार ड. गोविंद शर्मा, सरचिटणीस प्रा. डॉ. चंद्रजीत जाधव यांच्यासह महाराष्ट्राचे कबड्डी संघटनेचे उपाध्यक्ष माजी आमदार अमरसिंह पंडित, बीड जिल्हा परिषदेचे



माजी अध्यक्ष विजयसिंह पंडित, शारदा स्पोर्ट्स अकॅडमीचे संचालक रणवीर पंडित, महाराष्ट्र खो- खो संघटनेचे ज्येष्ठ संघटक शिवछत्रपती पुरस्कार विजेते प्रा. शेळके जे पी, बीड जिल्हा खो - खे संघटनेचे अध्यक्ष ऋषिकेश शेळके, रमेश भाऊ शिंदे, तसेच न्यू हायस्कूल शाळेचे मुख्याध्यापक अंकुशराव तौर, योगेश सोळशे, मनोज जोगदंड, विनोद शिंदे, कछवाय मॅडम, प्रफुल हाटवटे यांच्यासह शालेय समितीचे सर्व सदस्य, पंच, प्रशिक्षक व क्रीडाशिक्षक आदींनी विजय भागवत जाहेर यांचे अभिनंदन करून त्यांना शुभेच्छा व्यक्त केल्या आहेत .

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात